# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०२/०८/२०१९

## दि.०१/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २९६/१९,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०१९ रोजी सकाळी ११/२५ ते ११/४५ वा.चे दरम्यान उषा मोरेश्वर सोसा.चौथा मजला,फ्लॅट नं.१८,वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख २० हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण १,२७,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.एस.गंधारे ८८८८३३९३३९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४३२/१९,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२४,महा.पो.का.क.३७(१)(३) १३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.७ |
| **फिर्यादी** | उध्दव एडके,वय-२६ वर्षे,रा.स.नं.९३,साठेनगर,तरवडेवस्ती,महंमदवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०१९ रोजी पहाटे ०१/३० वा.स.नं.९३,साठेनगर,तरवडेवस्ती,महंमदवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घरी झोपले असताना, यातील नमुद इसमांनी त्यांचे वस्तीतील एक तीन चाकी पिवळ्या रंगाचा छोटा टेम्पो, दोन फोर व्हीलर व दोन ॲटो रिक्षा व चार ते पाच टु-व्हीलर या वाहनाची तोडफोड करुन नुकसान करुन,फिर्यादी यांचे गाडीची तोडफोड कऱण्यास येत असताना,फिर्यादी यांचे आईने त्यांना आमची गाडी फोडु नका असे म्हणाल्याचा राग मनात धरून,सदर इसमांनी फिर्यादी व त्यांचे आई-वडीलांना लोखंडी कोयत्याने वार करुन,त्यांना जखमी करुन,सदर परीसरात कोयते फिरवुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.डी.कांबळे ८८८८८१३६६४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २६२/१९,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२२ वर्षे,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१९ रोजी १२/५० वा. फिर्यादीचे राहते घरी मोबाईलवरून |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना,त्यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर यातील नमुद मोबाईल धारकाने फोन करून,मी एस.बी.आय. बँक क्रेडीट कार्ड विभागा मधून बोलत आहे असे भासवुन,फिर्यादी यांचे क्रेडीट कार्डची माहीती व ओटीपी विचारून,फिर्यादी यांचे खात्या मधुन ३९,९९९/- रूपये व २३,०००/- रूपये असे एकुण ६२,९९९/- रूपये गैर कायदेशीर ट्रान्झेक्शन करून,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलिस निरीक्षक,(गुन्हे), एस.एस.खटके ७५८८२३५८४४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५३४/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-७५ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/२०१९ रोजीपासुन ते दि.०१/०८/२०१९ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे ऑफिस मध्ये जाताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची खाजगी इंन्शुरन्स कंपनीची फास्ट ट्रॅक सुपर नावाची पॉलिसी असुन, तीचा वार्षिक प्रिमियम १,००,००८/- रुपये आहे. फिर्यादी हे बँकेच्या खात्यामधुन प्रिमियम नियमित भरतात. यातील नमुद मोबाईलधारक व्यक्तींनी फिर्यादी यांना फोन करून,मी इंन्शुरन्स कंपनीमधुन बोलत असल्याचे सांगून,त्यांचा विश्वास संपादन करून,तुमचा ग्रुपिंग फंड मॅच्युअर झाला असुन,कंपनीत इनिशियल पब्लिक ऑफर चालु आहे असे फिर्यादीस सांगून,त्याकरीता फिर्यादी यांना एकुण २६,९००/- रुपये सदर व्यक्तीचे खात्यावर भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल वाघमारे ९४२१३१२२१५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६६४/१९,भादविक ३५३,५०४,मोव्हेॲक्ट १७९,१३०/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | संजय करे, पो.हवा. कोंढवा वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | बंडु विश्वंभर नांदे,वय-४८ वर्षे,रा.वडाची वाडी बांदलवस्ती,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०१९ रोजी १५/४५ वा.उंडी चौक,ता.हवेली,जि.पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कोंढवा वाहतुक विभाग पुणे शहर येथे नेमणुकीस असुन,ते त्यांचे कर्तव्या साठी नमुद ठिकाणी हजर असताना,यातील नमुद इसम बंडु विश्वंभर नांदे याने त्याचे ताब्यातील टँकर हा चालवित घेवुन येत असताना,त्याने त्याचा टँकर हा रस्त्याचे मधोमध वाहतुकीस अडथळा होईल अशारितीने थांबवुन,त्यांना अपशब्द वापरून,त्यांचेशी हुज्जत घालुन,धक्का-बुक्की करुन,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.एस.पाडवी ९८२३६६००७४ |

## “ रक्षा ॲपचे पत्रकार परिषदे बाबत” दि.०२/०८/२०१९

**सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, पुणे पोलीस आयुक्तालयातर्फे नागरीकांसाठी विशेष करून, महिलांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सुरू करण्यात येणा-या “रक्षा ॲप” हे कसे चालते व त्याची उपयुक्तता,याबाबत सदर ॲपचा डेमो,त्याबाबतचे आपले मत घेण्यासाठी आज दि.०२/०८/२०१९ (शुक्रवार) रोजी १६/३० वा. पोलीस आयुक्त कार्यालयातील समिती कक्ष याठिकाणी दाखविण्यात येणार आहेत.**

**तरी आपले फोटोग्राफरसह आपली उपस्थिती प्राथनीय आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**